# अमरावती महानगरपालिका अमरावती
## पशुवैद्यकिय विभाग

जा.क्र. अमनपा/प.वै.वि./285/२०२६ दिनांक : 25 / 09 /२०२६

## जाहिर प्रगटन

या जाहिर प्रगटनाद्वारे अमरावती महानगरपालिका हद्दीतील सर्वमांस विक्रेत्यास (मटन/ चिकन/मासे) सुचित करण्यात येते की, मांस विक्री परवानासाठी मनपाकडुन नाहरकत प्रमाणपत्र घेवुन अन्न व सुरक्षा मानके अधिनियम २००६ व त्या अंतर्गत नियम व अधिनियम २०११ अन्वये अन्न व औषधी प्रशासनाकडुन मांस परवाना हस्तगत करण्यात यावा.

तसेच मांस विक्रेत्यांनी लहान जनावरे(शेळी,मेंढी,बोकड) अधिकृत कत्तलखाना, इतवारा बाजार येथेच जनावरांची कत्तल करावी. कत्तलखान्यावर जनावरांची पासींग करुन जनावरे कत्तल केल्यानंतर देण्यात येणारी पावती व मासावरील पासींगचा शिक्का विक्रीस ठेवलेल्या दुकानात दाखविणे बंधनकारक आहे. या व्यतिरीक्त आढळुन आलेले मास अनाधिकृत ठरवुन जप्त करुन योग्य ती विल्हेवाट लावण्यात येईल.

उघड्यावर विनापरवाना मटन/ चिकन/ मासोळी मास विक्री करण्यात येऊ नये. उघड्यावर विनापरवाना मांस विक्री करतांना आढळुन आल्यास संबंधित मटन/चिकन/ मासोळी विक्रेत्याविरुध्द महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ३८१,३८२ व जाहिर प्रगटनाचे अवहेलना केल्याबाबत संबंधित पोलिस स्टेशन मध्ये भा. द. वि. कलम २२३ व इतर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात येईल.

मास नाहरकत परवाना काढण्याची कार्यवाही अमरावती महानगरपालिकेच्या अधिकृत वेबसाईट वर जाऊन ऑनलाईन फॉर्म भरावा. फॉर्म भरण्यासाठी लागणारी कागदपत्रे पुढिलप्रमाणे १) दुकान दर्शविणारा मार्गदर्शक नकाशा २) चालु वर्षाची दुकानाची कर भरणा पावती ३) दुकानाचे लाईट बिल / दुकान भाडे करारनामा ४) सद्याचा पासपोर्ट फोटो ५) रु. १००/- कोरा बॉन्ड वरील करारनामा ६) आधार कार्ड ७) पॅन कार्ड ८) शॉप ॲक्ट परवाना९) मास दुकानाचा फोटो१०) कत्तलखाना पावत्या (लागु असल्यास ) ११) दुकान ही कोणत्याही धार्मिक स्थळापासुन साधारणपणे ५० मीटर लांब असावे १२) मांस दुकानाच्या आजुबाजुच्या नागरीकांचे नाहरकत प्रमाणपत्र ईत्यादी वरील प्रमाणे सर्व कागदपत्रे ऑनलाईन अपलोड करावी. आपण सादर केलेली कागदपत्रे तपासल्यानंतर पुढील कार्यवाही विभागातर्फे केली जाईल.

तसेच विनापरवाना मास दुकाने चालु ठेवुन मास विक्री करीत असलेल्या मास विक्रेत्यांना सुचित करण्यात येतेकी,मास विक्रेत्यांनी आपली मास विक्री दुकाने बंद ठेवुन १५ दिवसाच्या आतअर्ज करावा व तद्नंतर नाहरकत परवाना हस्तगत केल्यानंतरच आपली मास विक्रीची दुकाने चालु ठेवावी. जे मास विक्रेते विना परवाना दुकान चालु ठेवुन मास विक्री करत असतील अशा मासविक्री धारकाविरुध्द अमरावती महानगरपालिका अतिक्रमण विभाग व पशुसंवर्धन विभागामार्फत संयुक्तरित्या कार्यवाही करुन त्यांचे दुकानातील सामान जप्त करुन दुकान सिल करुन बंद करण्यात येईल. आणि त्याविरुध्द नियमानुसार गुन्हा दाखल करण्यात येईल. याची सर्व संबंधित मास परवाना धारकांनी गांभिर्याने नोंद घ्यावी.

25.9.26

(शिल्पा नाईक)
अतिरीक्त आयुक्त (२)
अमरावती महानगरपालिकाअमरावती

Scanned with OKEN Scanner